**ठळक बातम्या**

- भारतीय समुदाय जगभर उत्तम कामगिरी करत असून देशाला त्याचा अभिमान आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- क्षयरोग निर्मूलन अभियानासंदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयाचं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना पत्र
- एएसबी क्लासिक टेनिस स्पर्धेत भारताच्या युकी भांब्री आणि त्याचा फ्रेंच जोडीदार अल्बानो ऑलिवेट्टी या जोडीचा पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश

**आणि**

- देशाच्या उत्तर भागात थंडीची लाट आणखी तीव्र / पश्चिमेकडच्या वाऱ्यांमुळे आठवड्याच्या उत्तरार्धात वायव्य भारताच्या काही भागात पावसाची शक्यता

**<><><><><>**

भारतीय समुदाय जगभर उत्तम कामगिरी करत असून देशाला त्याचा अभिमान आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज ओदिशामध्ये भुवनेश्वर इथं १८ व्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचं औपचारिक उद्धाटन करताना बोलत होते.

**होल्ड 'बाईट'**

प्रवासी भारतीय दिवस संमेलन, हा केंद्रसरकारचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम, परदेशात स्थायिक झालेल्या भारतीय समुदायाला परस्परांच्या संपर्कात येऊन संवाद साधण्यासाठी महत्त्वाचं व्यासपीठ प्रदान करतो. भारतीय समुदायाच्या पर्यटनासाठी खास तयार करण्यात आलेल्या 'प्रवासी भारतीय एक्स्प्रेस'ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दृक्श्राव्य माध्यमातून हिरवा झेंडा दाखवला.

युवा प्रवासी भारतीय दिनाच्या उद्घाटना बरोबर कालपासून प्रवासी भारतीय दिन सोहळ्याला सुरुवात झाली. 'परदेशस्थ भारतीयांचं विकसित भारतासाठी योगदान', ही यंदाच्या तीन दिवसीय प्रवासी भारतीय दिवस सोहळ्याची संकल्पना आहे. विविध देशांमधल्या भारतीय समुदायाचे सदस्य मोठ्या संख्येनं या संमेलनाला उपस्थित आहेत. डॉ एस जयशंकर, अश्विनी वैष्णव, जुआल ओरम आणि ओदिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री या अधिवेशनाला उपस्थित आहेत.

जगभरात भारता विषयीची धारणा मजबूत करण्यात युवा प्रवासी भारतीयांनी महत्वाची भूमिका बजावली असून, देशाने 'विकसित भारताच्या' दिशेनं प्रवास सुरु केला आहे, असं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यावेळी म्हणाले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाच्या समारोप समारंभाला उपस्थित राहणार आहेत. यावेळी त्या परदेशस्थ भारतीय समुदायाच्या सदस्यांना विविध क्षेत्रातल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल 'राष्ट्रपती प्रवासी भारतीय सन्मान' प्रदान करतील.

**<><><><><>**

कटरा ते श्रीनगर या दरम्यानचा प्रवास ३ तास १० मिनिटात करणारी जम्मू-श्रीनगर वंदे भारत एक्स्प्रेस रेल्वे लवकरच सुरु होईल, असं रेल्वे मंत्रालयानं म्हटलं आहे. या रेल्वेला आठ डबे असतील बनिहाल ते कटरा या १११ किलोमीटरच्या टप्प्याची सुरक्षाविषयक अंतिम तपासणी सुरू झाल्याचं रेल्वे मंत्रालयानं म्हटलं आहे. या वर्षी रेल्वे सेवा प्रत्यक्ष सुरू होईल, असं स्पष्ट करण्यात आलं आहे. जम्मू स्थानकाचाही पुनर्विकास सुरू असून तिथं आठ फलाट आणि आधुनिक सेवासुविधा सुरू होणार असल्याचं रेल्वे मंत्रालयानं म्हटलं आहे.

दरम्यान, जम्मू-श्रीनगर वंदे भारत रेल्वे हिमवृष्टीतही चालू राहण्याच्या दृष्टीनं व्यवस्था करण्यात आली आहे. रेल्वेच्या ट्रॅकवर बर्फ पडल्यास सेवांवर परिणाम होऊ नये यासाठी बर्फ हटवणारी रेल्वेगाडीही विशिष्ट काळात चालवली जाईल.

**<><><><><>**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था -इस्रोनं स्पेडेक्स मोहिमेच्या अंतर्गत पृथ्वीच्या जवळच्या कक्षेत फिरणाऱ्या दोन उपग्रहांचं डॉकिंग म्हणजे जोडणीचा प्रयोग लांबणीवर टाकला आहे. दोन उपग्रहांमधलं अंतर जास्त वाढल्यामुळे हा प्रयोग पुढे ढकलावा लागल्याचं इस्रोनं स्पष्ट केलं आहे. इस्रोनं यापूर्वी हा प्रयोग सात जानेवारीला घेण्याचं जाहीर केलं होतं, मात्र तेव्हाही या

वाढलेल्या अंतरामुळे तो पुढे ढकलून आज घेण्याचं जाहीर करण्यात आलं होतं. आता पुढचा प्रयोग कधी होईल हे लवकरच जाहीर केलं जाईल असं इस्रोनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी दिल्ली भाजपाची बैठक आज होणार आहे. भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा या बैठकीत निवडणुकीच्या दृष्टीने संबंधित पदाधिकाऱ्यांशी चर्चा करतील. पक्षाच्या निवडणूक समितीची बैठक उद्या होणार असून त्यानंतर दुसरी उमेदवार यादी जाहीर होण्याची शक्यता आहे. दिल्लीतल्या एकूण ७० मतदारसंघांपैकी २९ ठिकाणचे उमेदवार भाजपाने जाहीर केले असून या आठवड्याखेरीपर्यंत उर्वरित ४१ उमेदवार जाहीर होतील अशी अपेक्षा आहे.

**<><><><><>**

'आपले सरकार सेवा पोर्टल'वर सध्या उपलब्ध असलेल्या ऑनलाइन सेवांचा विस्तार करण्यासाठी, राज्य सेवा हक्क आयोगानं आवश्यक पावलं उचलावीत असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. सेवा पोर्टलवर सध्या ५३६ पेक्षा जास्त सेवा उपलब्ध असून, त्याचा विस्तार केल्यावर नागरिकांना अत्यावश्यक सेवा अधिक सुलभतेने आणि कार्यक्षमतेने मिळतील असं ते यावेळी म्हणाले. मुख्यमंत्र्यांच्या

अध्यक्षतेखाली काल मुंबईत महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.

'आपले सरकार सेवा पोर्टल'च्या माध्यमातून ऑनलाइन सेवा देणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य असून, सरकारनं गतिशील आणि पारदर्शक प्रशासन जनतेपर्यंत पोहोचवलं आहे, असं ते म्हणाले. ऑनलाईन सेवांची व्याप्ती वाढवून सेवांची सहज उपलब्धता, सुलभता, पारदर्शकता आणि सर्वांसाठी अधिक दर्जेदार जीवन प्रदान करणं, हे सरकारचं उद्दिष्ट असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

देशभरात सुरू असलेल्या क्षयरोग निर्मूलन अभियानासंदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयाने सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना पत्र लिहिलं आहे. देशातून क्षयरोगाचं समूळ उच्चाटन व्हावं यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असून या अभियानात राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांनीही सहभागी व्हावं असं आवाहन या पत्रातून केंद्राने केलं आहे.

सर्व कारागृहं तसंच सुधारगृहांमध्ये १०० दिवसांच्या या अभियानाचं आयोजन करण्यात यावं, असे निर्देशही या पत्रात दिले आहेत. कारागृहांची रचना आणि त्यात असलेली कैद्यांची संख्या यांमुळे क्षयरोगाचा संसर्ग वाढण्यासाठी पूरक वातावरण तयार होतं. कैद्यांना भेटायला येणाऱ्या कुटुबीयांमार्फत मग त्याचा प्रसार होतो, त्यामुळे हे अभियान मोठ्या प्रमाणावर राबवण्याची गरज या पत्रात व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे येत्या ३

फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान राज्यांचे आरोग्य विभाग, राज्य तसंच जिल्हा पातळीवरचे क्षयरोग निवारण अधिकारी यांच्या मदतीने कारागृहांमध्ये निःक्षय शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत बॅडमिंटनपटू एच. एस. प्रणॉय आणि मालविका बनसोड यांनी त्यांच्या गटांमध्ये उप उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. प्रणॉयनं कॅनडाच्या ब्रायन यांगवर २१-१२,१७-२१,२१-१५ असा पराभव केला. मालविकानं मलेशियाच्याच गोह जिन वेईचा २१-१५, २१-१६ असा पराभव केला. मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टो यांनी दक्षिण कोरियाच्या संग ह्यून को आणि हाय वोन एओम यांचा २१-१३, २१-१४ असा पराभव केला. मिश्र दुहेरीतल्या दुसऱ्या सामन्यात सतीश आणि आद्या यांनी भारताच्याच आशित सूर्या आणि अमृता प्रमुतेश यांचा २१-१३, २१-१५ असा पराभव केला.

**<><><><><>**

उत्तर भारताच्या बहुतेक सर्व भागात थंडीची लाट आणखी तीव्र झाली आहे. या ठिकाणी तापमानात आणखी घट होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. पश्चिमेकडच्या वाऱ्यांमुळे आठवड्याच्या उत्तरार्धात वायव्य भारताच्या काही भागात पाऊस आणि हिमवर्षाव होण्याची शक्यता आहे.

हिमाचल प्रदेश, पंजाब, राजस्थान, पश्चिम मध्य प्रदेश, जम्मू-काश्मीर, लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान आणि मुझफ्फराबादमध्ये पुढले  दोन दिवस थंडीची लाट कायम राहील, तर पंजाब, हरियाणा, चंदीगड, दिल्ली आणि उत्तर प्रदेशमध्ये उद्यापर्यंत दाट ते अती दाट धुकं राहील. देशाच्या वायव्य भागात  उद्यापर्यंत किमान तापमानात सुमारे 2 अंश सेल्सिअस घट  होईल, आणि त्यानंतर हळूहळू २ ते ४ अंशानं वाढ होईल,  असा  हवामान विभागाचा अंदाज आहे.

दाट धुक्यामुळे संपूर्ण उत्तर भारतात रेल्वे आणि विमानसेवा विस्कळीत झाली असून दिल्लीकडे जाणाऱ्या जवळजवळ  25 गाड्या तीन ते चार तास उशिरा धावत आहेत.

जम्मू-काश्मीरमध्ये उद्यापर्यंत हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. काश्मीर आणि जम्मू च्या डोंगराळ भागात थंडीची लाट कायम आहे, काश्मीर मध्ये तापमान गोठणबिंदूच्या जवळ आहे, तर लडाख च्या विविध भागात गोठणबिंदूच्या वर आहे.

हिमाचल प्रदेशाच्या डोंगराळ भागात कोवळ्या उन्हामुळे वातावरण आल्हाददायक झालं आहे, तर मैदानी भागात दाट धुक्याचा थर पसरला आहे. राज्यात पुढले दोन दिवस हिमवर्षाव आणि पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

राजस्थानमध्ये आजपासून पावसाची शक्यता असून १० आणि ११ जानेवारी रोजी बिकानेर, जयपूर, भरतपूर, आणि अजमेरच्या काही भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

छत्तीसगडमध्ये थंडीची लाट आणखी तीव्र झाली असून, उद्यापर्यंत ती कायम राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.